# श्री वारणा सहकारी बँक लि., वारणानगर

ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

## वारणा बँक मयत वारस धोरण

## सन २०२५-२०२६

१) **प्रास्ताविक :-**

कुटुंबामधील एखादया सदस्याचा मृत्यू हा तया कुटुंबासाठी आर्थिक आणि मानसिकदृष्टया खूप क्लेशदायक असतो. अशा प्रसंगामध्ये मयत व्यक्तीचे बँकेशी असणारे आर्थिक संबंध आणि त्याची मयताच्या नामनिर्देशित व्यक्तीना किंवा कायदेशीर वारसाना सदरची रक्कम/लॉकर मधील असणारी संपती/ कागदपत्रे विनाक्लेश आणि कमीत कमी वेळात सुरळीतपणे मिळावी असिदरील रजेबाबतचे नियम यासाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी इंडियन बँक असोसिएशन यांना प्रत्येक बँकेसाठी आदर्श धोरण/मार्गदर्शक तत्वे तयार करून द्यावीत असे दिशानिर्देश दिले आहेत. याप्रमाणे आरबीएने सर्वसमावेशक धोरण तयार केले आहे. याचा उपयोग सर्व शाखांना मार्गदर्शक तत्वे म्हणून निश्चित करता येईल. तसेच बँकेचे ठेवीदार आणि लॉकरधारक यांना देखील या प्रसंगामध्ये सहानुभुतीने मदत करता यावी हा या धोरणाचा उददेश आहे. मयत व्यक्तीच्या ठेवी/लॉकर्स सुविधांचा विचार करीत असताना प्रामुख्याने तीन प्रकार येतात त्या म्हणजे नामनिर्देशन, Survivor किंवा नामनिर्देशन न केलेली ठेव किंवा लॉकर नामनिर्देशन, Survivorship केलेले असल्यास मयत व्यक्तीच्या वारसाना ठेवीची रक्कम अथवा लॉकर मधील संपती वेळेमध्ये मिळणे सहज आणि सुलभ होते मात्र असे केले नसल्यास या प्रक्रियेस विनाकारण दिरंगाई होवू शकते आणि त्याचा कुटुबीयांना नाहक मनस्ताप होवू शकतो.

२) **सर्वसाधारण सुचना :-**

- मयत व्यक्ती / खातेदार यांना धर्म कोणता आहे.
- मयत व्यक्तीने मृत्युपुर्वी मृत्युजंय केलेले आहे काय असे मृत्युपत्र केले असल्यास ते खरे असल्याबाबतचा कोर्टाचा दाखला (Probate) घेतलेला आहे काय ? (प्रत्येक केसमध्ये असा दाखला घेणे अनिवार्य नाही)
- बँकेच्या विहीत नमुन्यातील अर्ज भरून घ्यावा.

- मृत व्यक्तीच्या कायदेशीर वारस कोण आहेत?
- अशा कायदेशीर वारसाचे वय आणि त्याचे मृत व्यक्तीशी असणारे नाते संबंध विचारात घ्यावी लागतील.
- मृत व्यक्तिच्या नावावर असणाऱ्या ठेवी/लॉकर माहिती
- नामनिर्देशित व्यक्ती ही अज्ञान असल्यास, त्याकरीता अज्ञान पालनकर्ता नियुक्त करणे आवश्यक आहे. याबाबत अर्जामध्ये (DA-1) आवश्यक तो सर्व तपशिल बिनचूकपणे लिहावा.
- या व्यतिरिक्त अन्य काही तपशील महिती आवश्यक असल्यास शाखांनी ती घेणेची आहे.
- ठेवीदार/खातेदार हे अशिक्षीत (अंगठा) असल्यास शाखा कर्मचारी त्यांना ही सुविधा समजावून सांगतील याचबरोबर नामनिर्देशनाच्या अर्जावर (DA-1) अंगठा घेत असताना दोन साक्षीदारांच्या सहया घेतल्याखेरीज सदरचा अर्ज हा वैध ठरत नाही याबाबत सर्व दक्षता शाखा कर्मचारी यांनी घेण्याची आहे.
- नामनिर्देशनाच्या अर्जाचा (DA-1) उपयोग हा संबधीत खातेदराच्या मृत्युनंतर केला जातो. त्यामुळे शाखा कर्मचारी यांनी या अर्जामध्ये आवश्यक तो सर्व तपशीत बिनचुकपणे लिहावा
- नामनिर्देशित व्यर्ती ही अज्ञान असल्यास त्याकरिता अज्ञान पालनकर्ता नियुक्त करणे आवश्यक आहे. या बाबत अर्जामध्ये (DA-1) आवश्यक तो सर्व तपशिल बिनचूकपणे लिहावा.
- शाखांनी ठेवीवर/लॉकरवर हक्क सांगणा-या व्यक्ती यांना या सर्व बाबी सुरवातीस समजावून सांगणे आवश्यक आहे याबरोबर बँकेच्या विहीत नमुन्यात अर्ज कसा भरायचा त्यासोबत जोडावी लागणारी आवश्यक कागदपत्रे याबाबत सविस्तर माहिती लेखी अथवा तोंडी माहिती दयावी.
- कोणत्याही प्रकाराने शाखांनी या व्यक्तीच्या बाबतीत कोणतीही अपुर्ण माहिती देवू नये जेणेकरून हक्क सांगणा-या व्यक्तींना याचा शारीरिक अथवा मानसिक त्रास होईल.

- अशा प्रकरणांच्या बाबतीत शक्यतो शाखाधिकारी यांनी सदरचे प्रकरण हाताळावे. शाखाधिकारी अनुपस्थित असल्यास अकौंटट यांनी सदरचे प्रकरण हाताळावे.
- नामनिर्देशित व्यक्तीला ठेवलेल्या मुदतीच्या ठेवीच्या मुदतीत जमा झालेल्या व्याजासह मुळ पैसे मिळण्याचा हक्क असेल.
- ठेवीच्या मुदतीत नॉपिनीला नियतकालिक व्याज मिळण्याचा हक्क नाही तथापी ठेवीची मुदत झाल्यावर दावा सोडवण्याच्या वेळी नामनिर्देशित व्यक्तीला मुळ व जमा झालेले व्याज दिले जावू शकते.
- नामनिर्देशीत व्यक्तीला मृत्यु झालेल्या व्यक्तिची ठेव/खाते मुदतपुर्व बंद करण्याचा अधिकार असेल मात्र तत्पुर्वी त्यांनी दाव्यासाठी आवश्यक असणारी पुर्तता व मुदत पुर्वीचा अर्ज मंजूर करणे आवश्यक राहील.
- नामनिर्देशत व्यक्तीला संबधीत ठेवीवर कर्ज काढता येणार नाही.

## ३) खातेदाराच्या मृत्यूच्या सूचनेवर बँकेमार्फत कारवाई :-

- खातेधारकाच्या मृत्यूविषयी वृत्तपत्रात बातमी येणे, मृत्यूचे प्रमाणपत्र सादर करणे किंवा विश्वासार्ह स्त्रोतांकडील माहिती मिळाली असे समजण्यांत येईल.
- खातेधारकाच्या मृत्यूची शाखांना माहिती होताच, ती संगणक प्रणाली मध्ये संबंधित खात्यात नोंदवली जाईल आणि लागू होईल यानंतर या खात्यात व्यवहार करण्यास बँक प्रतिबंध करेल.
- मृत खातेधारकाने नामनिर्देशित व्यक्तीची नेमणूक केली असल्यास, खातेदाराच्या मृत्यूविषयी नॉमिनीला पत्र पाठवले जाईल.
- वैयक्तिक खाती : खातेधारकांच्या मृत्यूच्या तारखेच्या अगोदरच्या दिनांकाचा धनादेश असला तरी तो परत केला जाईल.
- संयुक्त खाती : जर उर्वरीत रक्कम उर्वरीत व्यक्तींना (Survivor) यांना देय असेल तर, उर्वरीत व्यक्तीच्या स्वाक्षरीने व्यवहार करता येतील.
- संयुक्त खाती (Survivorship): खातेदारांपैकी एखाद्याचा मृत्यू झाल्यास आणि त्यासाठी आवश्यक कागदपत्रे सादर केल्यानंतर सदरचे खातेवरील मयत व्यक्तीचे नांव कमी करून उर्वरीत व्यक्तीच्या नावे (Survivor)) खाते चालू ठेवता येईल.

- तीन किंवा त्यापेक्षा अधिक नांवाने खाते/ठेव/लॉकर्स असल्यास आणि जिथे खाते चालवणेचा प्रकार हा Either of Survivor असा असल्यास आणि या खातेधारकांपैकी एखाद्याचा मृत्यू झाल्याची माहिती दिल्यास उर्वरीत दोन खातेधारकांच्या नावे खाते चालू राहील.
- संयुक्त पध्दतीने (Joint Signature) /एकत्रित सहीने खाते/ठेव/लॉकर्स असल्यास आणि एका खातेदाराचा मृत्यू झाल्यास अशा खात्यावरील सर्व व्यवहार थांबविण्यात येतील, आणि विहित नमुन्यात दावा सादर केल्यानंतर खाते वापरता येईल.
- प्रोप्रायटर खात्याच्या बाबतीत प्रोप्रायटर यांचा मृत्यू झाला असल्यास आणि त्यापूर्वीच्या दिनांकाचे धनादेश असल्यास त्याचा आदर केला जाणार नाही. (सदरचे धनादेश परत पाठविले जातील.)
- एचयूएफ खात्याच्या बाबतीत कर्त्याचा मृत्यू झाला असल्यास अशा खात्यावरील सर्व व्यवहार थांबविण्यात येतील.
- ट्रस्टची खाती : ट्रस्ट डीडमध्ये स्पष्ट तरतूद नसल्यास विश्वस्तांना संयुक्तपणे कार्य करावे लागेल. एखाद्या विश्वस्तांचा मृत्यू झाल्यास, संबंधीत ट्रस्ट डीडने अस्तित्वात असलेल्या उर्वरीत विश्वस्त व्यक्तीला कार्य करण्यास अधिकार दिले नाही. तोपर्यंत कामकाज थांबविणे आवश्यक आहे. टॅस्ट डीडमध्ये कोणतीही विशिष्ट तरतूद नसतानाही, अस्तित्वात असलेल्या विश्वस्तांकडे व्यवहार करण्याचे पूर्ण अधिकार आहेत असे गृहित धरणे सुरक्षित नाही. शाखांनी या बाबतीत जागरूक असणे आवश्यक आहे.
- लिमिटेड कंपनीची खाती : जिथे एखाद्या कंपनीचे खाते चालविण्यास अधिकृत असलेल्या व्यक्तीच्या मृत्यूबद्दलची नोटीस प्राप्त झाली असले, अशा कंपनीच्या व्यक्तीने मृत्यूपूर्वी काढलेल्या धनादेशाची रक्कम दिली जाऊ शकतात. शाखेने कंपनीने त्यांच्या खात्याच्या व्यवहारासंदर्भात सादर केलेल्या संचालक मंडळाच्या ठरावाची दुरूस्ती किंवा नवीन ठराव आवश्यक आहे की नाही हे तपासले पाहिजे.
- कंपनीप्रमाणे सोसायटी, असोसिएशन, क्लब यांच्या खात्यांच्या बाबतीतदेखील वरील प्रमाणे कार्यवाही करणेची आहे.
- नामनिर्देशन अथवा कायदेशीर वारस यासंदर्भात दोघांच्या कडून दावे आल्यास किंवा या संदर्भात कोणताही वाद उपस्थित झाल्यास सक्षम न्यायालयाच्या आदेशाखेरीज कोणतीही देय रक्कम देता येणार नाही.

## ४) नामनिर्देशन :

- खातेदाराचा मृत्यू झाल्यास दाव्यांचा निपटारा करण्साठी सामान्य व्यक्तींच्या त्रास कमी करण्यासाठी हे एक उत्तम साधन आहे.
- नामनिर्देशन पध्दतीमुळे मयत व्यक्तींच्या कुटुंबीयांना अशी रक्कम त्वरीत आणि सुलभरित्या मिळते आणि सुलभरित्या मिळते आणि बँक देखील आपल्या जबाबदारीतून व्यवस्थित मुक्त होते.
- नामनिर्देशन हे केवळ एकाच व्यक्तिच्या नांवे करता येते.
- नामनिर्देशन हे केव्हाही, कधीही आणि कितीही वेळा बदलता येते कींवा रद्द करता येते. अशा वेळेस जो पर्याय सर्वात शेवटी उपलब्ध असतो ती ग्राह्य मानला जातो. (Latest available)
- सध्याच्या तरतुदीनुसार नामनिर्देशन करणे हे अनिवार्य नाही तथापी खाते उघडतेवेळेस अशी सुविधा उपलब्ध आहे आणि त्याचा उपयोग केल्यामुळे पुढील अडचणी टाळता येतात हे ग्राहकांना समजाऊन सांगितले पाहिजे ही जबाबदारी शाखेची आहे. हे समाजाऊन सांगत असताना योग्य त्या भाषेचा आणि शब्दांचा उपयोग करावा. यानंतर देखील नामनिर्देशन करण्यास नकार दिल्यास तशी नोंद खाते उघडणेचे अर्जावर करणे आवश्यक राहील.
- नामनिर्देशित व्यक्ती ही कायदेशीर वारसच असणे आवश्यक नाही. नामनिर्देशित व्यक्तिला सदरची रक्कम/लॉकर्स मधील वस्तु/कागदपत्रे ही स्वीकारता येतील मात्र त्याचा मालकी हक्क असेलच असे नाही.
- असे नामनिर्देशन न केल्यास मयत व्यक्तींच्या कुटुंबीयांना/वारसांना रक्कम/वस्तु/कागदपत्रे सक्षम न्यायलयाच्या आदेशानंतरच प्राप्त होऊ शकतात.
- नामनिर्देशनासाठी बँकेच्या विहित नमुन्यात (DA-1) अर्ज भरून देणे आवश्यक आहे या कमी शाखा कर्मचारी आवश्यक मदत/माहिती खातेदारांना उपलब्ध करून देऊ शकतात.

## ५) व्यक्तीगत आणि जोड खात्यांसाठी नामनिर्देशन सुविधा :-

- व्यक्तीगत खात्यांसंदर्भात ज्याप्रमाणे नामांकन सुविधा आहे त्याच प्रमाणे जोड खात्यामध्ये देखील नामांकन सुविधा उपलब्ध आहे.
- जोड खात्यामध्ये ''Either of Survivor" of "Anyone of Survivors" of "Former of Survivor" or "Letter of Survivor" या प्रकाराने खाते उघडता येते किंवा खात्यामध्ये बदल करता येतो.
- जोड खात्यामध्ये मिळून एकत्रित एका व्यक्तीस नामनिर्देशन करता येते.

- यासाठी आवश्यक नमुन्यातील (DA-1) अर्ज भरून देणे आवश्यक आहे.

**६) प्रोप्रायटरशीप खात्याबाबत :-**

- Sole Proprietor च्या कोणत्याही खात्यासंदर्भात नामनिर्देशन सुनिधा उपलब्ध आहे. याकरीता खातेदार यांनी बँकेच्या विहित नमुन्यातील (DA-1)फॉर्म भरून दिला पाहिजे. अन्य सूचना आणि नियम/अटी या सर्वसाधारण नामनिर्देशनाप्रमाणे राहतील.

**७) नामनिर्देशन केल्याची पोहोच पावती :-**

- ग्राहक/खातेदार यांनी नामनिर्देशन केल्यानंतर/बदल/रद्द केल्यानंतर त्याबद्दलची पोहोच ही संबंधीत ग्राहक/खातेदार यांना देणे कायद्याने बंधनकारक आहे.
- सध्या आपल्या खाते उघडण्याच्या फॉर्म मध्ये किंवा DA-1 मध्ये तरतूद नाही, पुढील छपाई मध्ये ही दुरूस्ती केली जाईल, किंवा संगणक प्रणालीमधून अशी पोहोच देण्याची व्यवस्था करण्यांत येईल तो पर्यंत शाखेने हाताने लिहून पोहोच द्यावी.

**८) नामनिर्देशनाची नोंद :-**

- ग्राहकांनी/खातेदारांनी दिलेल्या नामनिर्देशनाची नोंद संगणक प्रणालीमध्ये करणेची आहे, त्यानुसार खातेदारांच्या ठेव पावतीवर/पासबुकवर नामनिर्देशित व्यक्तीच्या नांवाची नोंद केली जाईल.

**९) नामनिर्देशनामध्ये बदल :-**

- कोणत्याही व्यक्तिला केलेल्या नामनिर्देशनामध्ये कोणत्याही वेळेस, कधीही, कितीही वेळेस बदल करता येईल. सर्वात शेवटी जो बदल केलेला असेल तो ग्राह्य मानला जाईल. शाखांनी याबाबतचे सर्व रेकॉर्ड/फॉर्म DA-3 संबधित खाते उघडणेच्या फॉर्म सोबत जोडून ठेवणेचे आहेत. सदरची बाब ही कायदेशीर असल्यानुळे यामध्ये सर्व माहिती, नोंदी या तपासून घेणे अत्यंत आवश्यक आहे.

**१०)नामनिर्देशन रद्द करणे :-**

- ग्राहकांना /खातेदारांना नोंद केलेले नामनिर्देशन हे कधीही रद्द करता येते यासाठी संबंधीत ग्राहकांनी/खातेदार यांनी विहित नमुन्यात (DA-2) फॉर्म भरून दिला पाहिजे.
- शाखेमधील कर्मचारी/अधिकारी यांनी ग्राहक/खातेदार यांना यावेळेस देखील नामनिर्देशनाचे असणारे फायदे त्यांना समजवून सांगणे आवश्यक आहेत.

११) **Power of Attomey / अधिकारपत्र :-**

- ग्राहक/खातेदार हे काही वेळा खाते चालवण्यासाठी Power of Attomey किंवा अधिकारपत्र देतात. असे Power of Attomey किंवा अधिकारपत्र म्हणजे वारस किंवा नामनिर्देशित व्यक्ती असे मानता येणार नाही. ज्यावेळेस संबंधित ग्राहकाचा/खातेदार यांचा मृत्यु झाल्यास यापूर्वी दिलेली Power of Attomey किंवा दिलेले अधिकारपत्र रद्द होते. अशा वेळेस Power of Attomey धारक किंवा अधिकार दिलेली व्यक्ती ही नामनिर्देशित व्यक्ती होऊ शकत नाही.

१२) **Survivorship :-**

- एका पेक्षा अधिक खातेदारांच्या नावाने खाती उघडली जातात अशी सर्व खाती जोड खाती (Joint Account) मानली जातात. अशी खात्यांमध्ये ''Either of Survivor" of "Anyone of Survivors" of "Former of Survivor" or "Letter of Survivor" याप्रकारची खाती असतात किंवा एकत्रित सहीने या पध्दतीने चालविली जातात.
- ''Either of Survivor" of "Anyone of Survivors" of "Former of Survivor" or "Letter of Survivor" याखात्यांमध्ये एखाद्या खातेदाराचा मृत्यु झाल्यास त्या खात्यावरील सर्व व्यवहार अव्याहतपणे चालू राहतात. अशा प्रसंगामध्ये जीवित असणाऱ्या खातेदारांनी बँकेस माहिती व कागदपत्रे सादर केल्यानंतर मृत्यु झालेल्या खातेदार यांचे नांव कमी होते आणि तेच खाते जोड खात्या ऐवजी वैयक्तिक खाते म्हणून पुढे चालू राहते. जीवित असणारा खातेदार यामध्ये दुसऱ्या खातेदार यांचे नांव वाढवू शकतो.

१३) **कालमर्यादा :-**

- नामनिर्देशित व्यक्तीच्या दाव्याचे निराकारण हे सर्व आवश्यक असणारी सादर केल्यानंतर १५ दिवसांच्या आत होणे आवश्यक आहे.
- नामनिर्देशित न केलेल्या दाव्याचे निराकरण हे सर्व आवश्यक असणारी सादर केल्यानंतर ६० दिवसांच्या आत होणे आवश्यक आहे.
- बँक शेअर्स परत मागणी बाबत दाव्याचा प्रस्ताव ६० दिवसाचे आत करणे आवश्यक आहे.

१४) **आवश्यक बाबी :-**

- मयत खातेदाराचे वारसाकडून बँकेच्या नमुन्यातील मयत वारस फार्म घेणे.
- सोबत खातेदाराचा मृत्यु दाखला घेणे
- वारस (दाखला) ॲफीडेव्हेट घेणे

- खातेदाराचे सर्व खात्यांची माहिती फार्म बँक नमुन्यातील १५ दिवाची नोटीस नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणे
- संचालक मंडळ सभेत मंजूरी घेवून इंडेम्निटी बॉन्ड पुर्तता करून वारसाचे खातेवर ठेव रक्कम वर्ग केली जाते.
- यात होणारा विलंब पहाता यामध्ये बदल करणेत येत असून इतःपर जर ठेवीदाराने ठेव ठेवते वेळी रितसर (D 1 Form) बँकेस दिला असलेस सदर ठेव रक्कम सदर नामाकंन (Nominee) केलेल्या व्यक्तीकडून खालील कागदपत्रे घेणेत यावी.
- बँकेच्या विहीत नमुन्यातील अर्ज भरून घ्यावा.
- मृत्यु दाखला ओरिजनल सोबत शाखाधिकारी यांनी स्वतः तपासून सत्यप्रत (Attested) करून घ्यावा.
- बँकेच्या विहीत नमुन्यात नामाकंन व्यक्ती (Nominee) कडून इंडेम्निटी बॉन्ड करून घ्यावा.
- नामाकंन व्यक्ती Nominee ची केवायसी घेवून रक्कम सदर नामाकंन व्यक्तीच्या Nominee आपले बँकेकडे खाते असलेस खातेवर जमा दयावी अन्यथा डि डी ने दयावी. (NEFT /RTGS चा वापर करू नये.)
- वरील पध्दती D 1 Form दिलेल्या ठेवीदारासाठीच असेल D 1 फॉर्म ठेव ठेवलेल्या तारखेचा व खाडाखोड नसलेची खात्री करणे
- बँकेच्या सभासद व्यक्तीसाठी व D 1 फॉर्म न दिलेल्या ठेवीसाठी पुर्वीचीच पध्दत अवलंबावावी.

## १५)बेपत्ता व्यक्तीच्या नांवावरील खाती/ठेव/लॉकर :-

- हरवलेल व्यक्तीच्या संदर्भातील दाव्यांचा तोडगा Indian Evidence Act - १८७२ मधील कलम १०७ आणि १०८ मधील तरतुदीद्वारे संचलित केले जाते. या तरतुदीनुसार सदरची व्यक्ति ही बेपत्ता असल्याची नोंद झाल्यापासून सात वर्षाने सदरची व्यक्ति मयत झाली असे मानले जाते. याबाबतीत सक्षम न्यायालयाच्या आदेशानुसार या व्यक्तिचा मृत्यू झाला अशी नोंद होते. या नंतर या खातेदार/ठेवीदार/लॉकर धारक यांचा प्रस्ताव विचारात घेता येईल. या सदंर्भात कोणतेही हक्क/दावा हे कितीही रक्कम असली तरी त्यांचे मंजुरीचे अधिकार हे मा.कार्यकारी समिती किंवा मा.संचालक मंडळाच्या कार्यकक्षेत येईल. अन्य कागदपत्रांच्या सोबत एफआयआर ची प्रत आणि सक्षम न्यायालयाचा आदेश हे यामध्ये अनिवार्य राहील.

१६)**ठेवीवरील व्याजाबाबत :-**

- मयत व्यक्तीच्या एकट्याच्या नांवावर किंवा संयुक्त नांवावर ठेव असल्यास या प्रमाणे व्याज देण्यात येईल.

  - ठेवीची मुदत संपणाऱ्या दिवशी मागणी केली असल्यास ठेवीच्या मूळ करारामधील व्याजदराप्रमाणे रक्कम दिली जाईल.

  - ठेवीची मुदत संपण्याच्या अगोदर रक्कमेची मागणी केली असल्यास ठेव दिनांकापासून (Date of Deposit) देय दिनांकापर्यंत (Date of Payment) जितका कालावधी झाला आहे त्या कालावधीसाठी ठेव दिनांकास असणाऱ्या व्याजदरानुसार व्याज आकारणी केली जाईल आणि ती रक्कम मूळ मुद्दलासहित दिली जाईल. यामध्ये मुदतपूर्व रक्कम मागणी केल्याप्रमाणे आकारले जाणारा दंड आकारला जाणार नाही.

  - ठेवीदार यांचा मृत्यू मुदत संपते दिनांकाच्या नंतर झाला असल्यास आणि मुदत संपल्यानंतर रक्कमेची मागणी केली असल्यास ठेव दिनांकापासून ते मुदत संपते दिनांकापर्यंत जो करारप्रमाणे व्याजदर असेल ती होणारी रक्कम आणि त्यानंतर पुढील देय दिनांकापर्यंत सेव्हिंग ठेवीच्या व्याजदराने किंवा लागू असलेल्या व्याजदाराने यामधील कमी असेल त्या दराने होणारी रक्कम दिली जाईल. तसेच करंट खात्याचे बाबतीत खातेदाराचा मृत्यु झालेचे दिनांकापासून जमाखर्च केलेल्या तारखेपर्यंत सेव्हिंग खात्याच्या प्रचलीत व्याजदराप्रमाणे व्याज आदा केले जाईल.

  - ठेवीदार याचा मृत्यू हा मुदत संपले दिनांकाच्या आधी झाला असल्यास आणि मुदत संपल्यानंतर मागणी केली असल्यास ठेव दिनांकापासून ते मुदत संपते दिनांकापर्यंत करारमधील व्याजदरानुसार आणि त्यापुढे देय दिनांकापर्यंत सेव्हिंग ठेवीच्या व्याजदराने किंवा लागू असलेल्या व्याजदराने यामधील कमी असेल त्या दराने होणारी रक्कम दिली जाईल.
  - नामनिर्देशित व्यक्तीनी/कायदेशीर वारसांनी मयत व्यक्तीची ठेव मुदत संपण्यापूर्वी आपल्या नावे करण्याची मागणी केली असल्यास मागणी दिनांकापर्यंत झालेल्या मुदतीकरीता ठेव दिनांकाच्या दिवशी असणारा व्याजदराने रक्कम देवून नामनिर्देशित व्यक्ती/कायदेशीर वारस याच्या नावे नव्याने ठेव करून देता येईल यासाठी मुदतपूर्व दंड आकारला जाणार नाही.

(ठेवीवरील व्याजाच्या आयकर विषयक तरतुदीमुळे अश्या ठेवीवरील केवळ नामनिर्देशित/कायदेशीर वारसदार यांचे नांव बदलणे करता येणार नाही.)

**१७)<u>नामनिर्देशित न केलेल्या (Without Nomination) दाव्यासाठी लागणारी कागदपत्रे :-</u>**

- एखाद्या खातेदार/ठेवीदार/लॉकर धारक यांचा मृत्यू झाल्यास आणि त्यांचे खातेवर नामनिर्देशन सुविधा अथवा Either of Survivor अशी नोंद केली नसल्यास मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या नांवावर असणारी रक्कम/संपत्ती ही केवळ त्यांच्या कायदेशीर वारसांना दिली जाईल.
- यामध्येसुध्दा संबधित वारसाना ही रक्कम/संपत्ती सुलभपणे आणि कमी कालावधीमध्ये मिळावी यासाठी बँकेने दोन पर्यायांचा विचार केला आहे.

सदर पॉलिसी दि.०३/०५/२०२५ चे संचालक मंडळ सभेमध्ये सन २०२५-२०२६ करीता मंजूर झाली असून नवीन सुधारीत पॉलिसी होईतोपर्यंत ही ग्राह्य धरावी.

**श्री वारणा सहकारी बँक लि.,वारणानगर**

**(राजेश प. सार्दळ)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**